पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ३९
सभावृत्तांत

दिनांक :- २०.११.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोव्हेंबर-२००९ ची मासीक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.११.२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.अपर्णा निलेश डोके महापौर
२. मा.बो-हाडे शरद परशुराम उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.थोरात एकनाथ दादा
६. मा.दत्तात्रय बाबुराव साने
७. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
८. मा.लोखंडे सुजाता सुनिल
९. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
१०. मा.आल्हाट शांता महेंद्र
११. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१२. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
१३. मा.कुंभार रामदास तानाजी
१४. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
१५. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१६. मा.गवळी विजया पंडित
१७. मा.अजित दामोदर गव्हाणे
१८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१९. मा.महेश किसन लांडगे

२०. मा.आशा अंकुश लांडगे

२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२७. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२८. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२९. मा.यशवंत भोसले

३०. मा.बहल योगेश मंगलसेन

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३६. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३७. मा.भापकर मारुती साहेबराव

३८. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३९. मा.बोबडे भिमा सखाराम

४०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४१. मा.गवळी शशीकिरण

४२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४३. मा.उबाळे वैशाली संजय

४४. मा.सुमनताई मधुकर पवळे

४५. मा.कुमार आर. एस.

४६. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४७. मा.उल्हास शेट्टी

४८. मा.जावेद शेख

४९. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५०. मा.कुटे गोपाळ नाना

५१. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५२. मा.भोंडवे तुकाराम महादू

५३. मा.खानोलकर मनोज विक्रम

५४. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५६. मा.वाघ रघुनाथ दलपत

५७. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५८. मा.आण्णा दादू बनसोडे

५९. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६०. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६१. मा.गावडे जयश्री वसंत

६२. मा.साबळे जगन्नाथ दगडू

६३. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६४. मा.रामआधार धारिया

६५. मा.आसवानी डब्बु

६६. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६७. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६८. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६९. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

७०. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

७१. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७२. मा.भारती ज्योती सुखलाल

७३. मा.कोकणे संतोष अंकुश

७४. मा.सुतार विजया विजय

७५. मा.दरेकर सतीश दगडू

७६. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७७. मा.बारणे संतोष नागु

७८. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७९. मा.कलाटे कमल तानाजी

८०. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

८१. मा.खोमणे लता हनुमंत

८२. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८३. मा.अशोकभाई सोनवणे

८४. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८५. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८६. मा.जगताप शंकर पांडुरंग

८७. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८८. मा.एकनाथ मोटे

८९. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९०. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९२. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९४. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

९५. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९६. मा.प्रशांत शितोळे

९७. मा.साळुंखे सुरेखा मारुती

९८. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९९. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

१००. मा. विनायक सुरेश रणसुभे

१०१. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

१०२. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.मुंढे, मा.पवार, मा.गावडे-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.चव्हाण- अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.साळवी,मा.इंगळे,मा.जाधव,मा.दुधेकर-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य) व मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ज्येष्ठ लेखिका व कै.पु.ल.देशपांडे यांच्या पत्नी- सुनीता देशपांडे,नगरपालिकेचे माजी नगरसदस्य-खिल्लू ओछानी, अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचे संस्थापक चेअरमन श्री.बाळासाहेब गव्हाणे यांच्या मातोश्री- सोनाबाई सदाशिव गव्हाणे, ज्येष्ठ संगीतज्ज्ञ पद्माकर कुलकर्णी यांच्या पत्नी व निवृत्त शिक्षिका-प्रतिभा कुलकर्णी, नगरसदस्य मा.सिध्देश्वर बारणे

यांच्या आजी- तुळसाबाई धाकुजी बारणे, दिपक वेटम, सुरज भगवान रासकर, रोहित सिंग, पोलीस सब-इन्स्पेक्टर-पाटील दौलत मालोजी
यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहुन सभा तहकुब करणेत यावी.

मा.मारुती भापकर :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दि. २०.११.२००९ रोजी दुपारी २.२५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(अपर्णा निलेश डोके )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ३९

## सभावृत्तांत

(दि. २०.११.२००९ (दु.२.००) ची तहकूब सभा)

दिनांक :- २०.११.२००९ वेळ :- दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.११.२००९ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.११.२००९ रोजी दुपारी २.२५ वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.अपर्णा निलेश डोके | महापौर |
| २. | मा.बो-हाडे शरद परशुराम | उपमहापौर |
| ३. | मा.भालेकर शांताराम कोंडीबा | |
| ४. | मा. घुले रघुनंदन रामभाऊ | |
| ५. | मा.थोरात एकनाथ दादा | |
| ६. | मा.दत्तात्रय बाबुराव साने | |
| ७. | मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव | |
| ८. | मा.लोखंडे सुजाता सुनिल | |
| ९. | मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर | |
| १०. | मा.आल्हाट शांता महेंद्र | |
| ११. | मा.डॉ. सौ. मीना पाटील | |
| १२. | मा.खेडकर घनशाम रामचंद्र | |
| १३. | मा.कुंभार रामदास तानाजी | |
| १४. | मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे | |
| १५. | मा.सौ. बढे सुलोचना बबन | |

१६. मा.गवळी विजया पंडित

१७. मा.अजित दामोदर गव्हाणे

१८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१९. मा.महेश किसन लांडगे

२०. मा.आशा अंकुश लांडगे

२१. मा.प्रशांत शितोळे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२७. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२८. मा.साळुंखे सुरेखा मारुती

२९. मा.यशवंत भोसले

३०. मा.बहल योगेश मंगलसेन

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.काळूराम मारुती पवार

३५. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३६. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३७. मा.भापकर मारुती साहेबराव

३८. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३९. मा.बोबडे भिमा सखाराम

४०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४१. मा.गवळी शशीकिरण

४२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४३. मा.उबाळे वैशाली संजय

४४. मा.सुमनताई मधुकर पवळे

४५. मा.कुमार आर. एस.

४६. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४७. मा.उल्हास शेट्टी

४८. मा.जावेद शेख

४९. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५०. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

५१. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५२. मा.भोंडवे तुकाराम महादू

५३. मा.खानोलकर मनोज विक्रम

५४. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५६. मा.वाघ रघुनाथ दलपत

५७. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५८. मा.आण्णा दादू बनसोडे

५९. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६०. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६१. मा.गावडे जयश्री वसंत

६२. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६३. मा.रामआधार धारिया

६४. मा.आसवानी डब्बु

६५. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६६. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६७. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६८. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

६९. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७०. मा.भारती ज्योती सुखलाल

७१. मा.कोकणे संतोष अंकुश

७२. मा.सुतार विजया विजय

७३. मा.दरेकर सतीश दगडू

७४. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७५. मा.बारणे संतोष नागु

७६. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७७. मा.कलाटे कमल तानाजी

७८. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

७९. मा.खोमणे लता हनुमंत

८०. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८१. मा.अशोकभाई सोनवणे

८२. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८३. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८४. मा.जगताप शंकर पांडुरंग

८५. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८६. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८७. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८९. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९१. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९२. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९३. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.मुंढे, मा.पवार, मा.गावडे-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगिले-शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.चव्हाण- अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.साळवी,मा.इंगळे,मा.जाधव,मा.दुधेकर-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य) व मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्र.३८ दि.२०.१०.२००९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७३२ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.वैद्य/७/कावि/२३४९/०९ दि.१४/१०/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९४७१ दिनांक २०/१०/२००९

भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर ऑफिस मेमोरेण्डम क (B-12014/7192-CGHSCP) दिनांक:-३१/१२/१९९३ भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर कडील दिनांक:-१७/९/१९९९ चे दुरुस्ती अन्वये कर्मचाऱ्यांवर अवलंबुन असणाऱ्या अविवाहीत मुलाचे वय २५ वर्षे व जो

मुलगा अपंग (Physicaly व Mental) असेल त्यांचेबाबतीत वयाची अट शिथिल करुन सी.जी.एच.एस. मध्ये सुविधा उपलब्ध असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी व अधिकारी व शिक्षण मंडळ कर्मचारी व अधिकारी यांच्या अपंग पाल्यास (Physicaly व Mental) वैद्यकीय सुविधा व बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्यात अडचण निर्माण होवु नये म्हणुन कर्मचाऱ्याचा पाल्य अपंग असेल (Physicaly व Mental) तो पुर्णपणे कर्मचाऱ्यावर आर्थिकदृष्ट्या अवलंबुन असेल याबाबत योग्य ते पुरावे सादर केले तर त्यास मनपा दवाखान्यात/रुग्णालयात मोफत उपचार सोईसुविधा तसेच नियमानुसार देय इतर बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.
मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी आणि त्यांच्यावर अवलंबीत कुटूंबीयाना महानगरपालिकेच्या वतीने वैद्यकीय बिलाची प्रतिपुर्ती करुन देतो. कुटूंबाच्या व्याखेप्रमाणे कर्मचा-यांवर अवलंबून असलेला मुलगा/मुलगी यांची वयोमर्यादा २५ झाल्यानंतर वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती करुन देत नव्हतो. महाराष्ट्र शासनाच्या जीआर प्रमाणे अपंग पाल्यास त्याचा वयाचा विचार न करता कर्मचा-यावर पुर्णपणे अवलंबीत असल्यास योग्य ते पुरावे घेवून महापालिकेच्या रुग्णालयात मोफत औषधोपचार व इतर खाजगी रुग्णालयात औषाधोपचाराचा जो खर्च झालेला आहे त्याचे बील अदा करण्यासाठीचा हा विषय आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१अ/कावि/४२६/०९ दि.२२/७/०९

२) मा.विधी समिती सभा दिनांक ११/८/२००९ ठराव क्र.११५

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९४७३ दिनांक २७/१०/२००९

पाणीपुरवठा-जलशुद्धीकरण केंद्राचे कामकाज व कामाची निकड विचारात घेता पाणीपुरवठा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ७ संवर्गात ६५ पदे

नव्याने निर्माण करण्यास व त्यापैकी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६१ पदे पुर्वीचे मंजुर अर्हतेत तर उर्वरित ०४ पदे सोबतचे प्रपत्र अ मधील अर्हतेत निर्माण करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी मान्य करणेत येत आहे व त्याव्यतिरीक्त महापालिका आस्थापनेवरील गाळणी चालक व असि.गाळणी निरीक्षक या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान म्हणजेच र.रु.४०००-६००० अशी असून सदर पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती सोपान नसल्याने गाळणी निरीक्षक संवर्गातील एकुण पदांपैकी ७०% पदे सरळसेवेने तर ३०% पदे पदोन्नतीने भरण्यास व ३०% पदे पदोन्नतीने भरण्याकरीता येणारी पदे प्रपत्र ब मधील अर्हतेनुसार भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र साळूंके :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मनपाच्या जलशुध्दीकरण केंद्रावर पाण्याची गुणवत्ता राखणे, रासायनीक तपासणी करणे, पाण्यास आवश्यक ती ट्रिटमेंट देणे, वितरण व्यवस्थेतील पाणी तक्रारीचे निराकरण करणे, पाण्याच्या संबंधीचा अहवाल पाठविणे इ. कामे केमीस्ट यांच्याकडून करुन घेणेत येत असून सध्या जलशुध्दीकरण केंद्रावर केमीस्ट अभिनामाचे फक्त एकच पद उपलब्ध असल्याने मनपाच्या हद्दीत नव्याने आलेल्या क्षेत्रवाढीमुळे वाढीव कामाकरिता केमीस्ट या अभिनामाचे अजून एक पद निर्माण करणे आवश्यक आहे त्याकरिता केमीस्ट अभिनामाचे एक नवीन पद यापुर्वीच्या केमीस्ट पदाच्या र.रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणी मध्ये निर्माण करणेस व ते पद पदोन्नतीने भरणेस व त्याकरिता पदोन्नतीसाठी मनपा सेवेत असिस्टंट केमीस्ट या पदावर किमान आठ वर्षे सेवा पुर्ण याप्रमाणे अर्हता ठेवणेस मान्यता देणेत यावी.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब,उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, विषयाला माझा विरोध नाही. काही दिवस अगोदर पाऊस भरपूर पडला, २४ तास पाणी बंद होते. रावेतमध्ये एक्सप्रेस फिडर आहे. आपण जनरेटर बसविले आहेत ते काही महिन्यापासून बंद होते. मशिन चार ते सहा महिने बंद राहते हे योग्य नाही. जनरेटर रिपेअरींग केल्यानंतर सुध्दा ते त्या दिवशी बंद होते त्यामुळे पाणीपुरवठा बंद राहिला. त्यादिवशी तूपे साहेबांनी रात्रंदिवस काम करुन ते चालू केले परंतु जनरेटर बंद का होते ते चालू असतेतर पाणी फिल्ट्रेशन झाले असते आणि नागरीकांना पाणी मिळाले असते. जनरेटर पुर्ण लोड घेऊ शकत नाहीत असे सांगीतले. ज्यावेळेला आपण जनरेटर खरेदी केले त्यावेळेला लोडचा विचार केला नाही का. टोटल लोड वर्कआऊट करुन ते खरेदी केले नाहीत, त्याला अधिकारी जबाबदार आहेत. एखादी मशिनरी रिपेअरींग करण्यासाठी किती दिवस लागतात. रिपेअरींग केल्यानंतर लगेच बंद कसे काय पडतात याची चौकशी व्हायला पाहिजे. जनरेटर बरोबर खरेदी केले का याची सुध्दा चौकशी व्हायला पाहिजे. दहा दिवस अगोदर रिपेअरींग केल्यानंतर परत ते बंद कसे काय पडतात याची चौकशी केली पाहिजे. नागरीकाना त्रास व्हायला नाही पाहिजे,पाणीपुरवठा सुरळीत चालू राहायला पाहिजे.

मा.महापौर :- जनरेटर बाबतच्या समस्या लवकरात लवकर सोडवून शहराला पाणीपुरवठा सुरळीत,चांगल्या दाबाने व स्वच्छ करण्यात यावा. त्याकरीता निश्चितपणे उपाययोजना करण्यात याव्यात. प्रशासनाने खुलासा करावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, वायसीएम हॉस्पिटलमध्ये एक्स-रे मशीन बंद आहेत, पेशंटचे हाल होतात, नवीन एक्स-रे मशीन घेतलेले आहे ते सुध्दा चालू झालेले नाही. तेथील पेशंट डी.वाय. पाटिल हॉस्पिटलमध्ये व प्रायव्हेट हॉस्पिटलमधे पाठवतात.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, से-२३ जलशुध्दीकरण केंद्र येथे जो जनरेटर बसविण्यात आलेला आहे तो ६०० केव्हीए कपॅसिटीचा आहे. से-१,२ व कृष्णानगर भागामध्ये पंपींग केले जाते तसेच प्राधिकरणाच्या टाक्यामध्ये पंपींग केले जाते त्याकरिता मोटार आहे. त्याचा सुरवातीचा करंट अतीशय जास्त असतो. हायेस्ट करंटमुळे वारंवार बीघाड होत होता. सुरवातीच्या काळात तो चालवला. तरीही तो वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे आता निर्णय घेतलेला आहे से-२३ जलशुध्दीकरण केंद्र येथे २ फिडर आहेत रावेत नदीवरील पाण्याचे उपसा केंद्र त्याठिकाणी सुध्दा जनरेटर बसविलेला नाही. से-२२ व से-२४ प्राधिकरण येथे महापालिकेच्या सबस्टेशन करता दोन फिडर उपलब्ध करणार आहोत. तेथून से. २३ पर्यंत केबल टाकलीतर से.२३ पर्यंत आखंड विदयूतपुरवठा येऊ शकतो.
जनरेटर बसविणे योग्य होणार नाही. त्या पध्दतीने प्रस्ताव ठेवलेला आहे. मा.आर.एस.कुमार यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे वादळ आले त्या रात्री एमआयडीसीच्या जलशुध्दीकरण केंद्राच्या ठिकाणी झाडे असल्यामुळे त्याठिकाणचे पोल पडलेले होते. त्याठिकाणी मी रात्रभर एमएसईबीच्या इंजिनिअर बरोबर होतो. त्याठिकाणची सर्व झाडे उदयान विभागाच्या सहाय्याने काढणार आहोत त्यामुळे विजपुरवठा उपलब्ध होऊ शकेल. आता जनरेटर चालू केले असलेतरी ते पंपींग करता वापरु शकणार नाहीत. फिल्टर व बॅकवॉश करता त्याचा उपयोग होऊ शकतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, जगात कुठेही अशी मशीन नाही की ती जनरेटरवर चालू शकत नाही. रावेत मध्ये एक्सप्रेस फिडर आहे दोन्ही फिडर कसे काय बंद होते. वीस-वीस तास लाईट जाते त्यानंतर पाणी लेव्हल आणि बॅलेन्सींग करायला ४८ तास लागतात त्यामुळे नागरीकांना पाणी मिळत नाही. रावेत येथे सुध्दा जनरेटर बसवावा. जनरेटर तुम्ही बाहेरुन मागवा त्यासाठी पाच-दहा कोटी जाऊ दया परंतु जनरेटर पाहिजे. एमएसईबीच्या लाईटवर विश्वास नाही. दिवसातून चार-पाच वेळा लाईट जाते. त्यादिवशी पंधरा तास लाईट नव्हती. टोटल कपॅसिटीचे जनरेटर बसवावेत अन्यथा पब्लिक माफ करणार नाही.

मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, नवीन एक्स-रे मशीन बसविण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, दोन्ही एक्स-रे मशीन आठ ते पंधरा दिवसापासून बंद आहेत.

मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, पुर्वीचे एक्स-रे मशीन जुने असल्यामुळे नवीन मशीनचे आदेश दिलेले आहेत. १०० एमए चे मशीन चालू आहे ५०० एमए च्या मशीनचे इलेक्ट्रीक कनेक्शनचे काम चालू आहे ते लगेच चालू होईल.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

ठराव क्र.६८६ दिनांक ४/७/२००९ अन्वये कार्यालय अधिक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत मान्यता देण्यात आली असून त्यांस पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यालय अधिक्षक पदावरील कर्मचारी की जे पदवीधर आहेत व पदावर ७ वर्षे सेवा झाली आहे. अशांना पदोन्नती देऊन भरण्याबाबत मान्यता आहे. त्याऐवजी प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यालय अधिक्षक पदावरील ७ वर्षे सेवेची अट शिथील करुन कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात यावी त्यांस विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी महासभेच्या मान्यतेनुसार मा.आयुक्त यांनी तात्काल कार्यवाही करावी शासन मंजूरी लागत असल्यास शासन उमेदमान्यतेवर पदोन्नती देण्यात यावी.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.रामदास कुंभार :- मा.शंकर जगताप व मा.योगेश बहल यांची मा.राजेंद्र साळूंके व मा.उत्तम हिरवे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७३३ विषय क्रमांक :- २

दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.प्रशा/१अ/कावि/४२६/०९ दि.२२/७/०९

२) मा.विधी समिती सभा दिनांक ११/८/२००९ ठराव क्र.११५

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९४७३ दिनांक २७/१०/२००९

पाणीपुरवठा-जलशुद्धीकरण केंद्राचे कामकाज व कामाची निकड विचारात घेता पाणीपुरवठा विभागाच्या आस्थापनेवर एकुण ७ संवर्गात ६५ पदे नव्याने निर्माण करण्यास व त्यापैकी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ६१ पदे पुर्वीचे मंजुर अर्हतेत तर उर्वरित ०४ पदे सोबतचे प्रपत्र अ मधील अर्हतेत निर्माण करण्यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी मान्य करणेत येत आहे व त्याव्यतिरीक्त महापालिका आस्थापनेवरील गाळणी चालक व असि.गाळणी निरीक्षक या दोन्ही

पदांची वेतनश्रेणी समान म्हणजेच र.रु.४०००-६००० अशी असून सदर पदावरील कर्मचा-यांना पदोन्नती सोपान नसल्याने गाळणी निरीक्षक संवर्गातील एकुण पदांपैकी ७०% पदे सरळसेवेने तर ३०% पदे पदोन्नतीने भरण्यास व ३०% पदे पदोन्नतीने भरण्याकरीता येणारी पदे प्रपत्र ब मधील अर्हतेनुसार भरण्यास मान्यता देणेत येत आहे. मनपाच्या जलशुध्दीकरण केंद्रावर पाण्याची गुणवत्ता राखणे, रासायनीक तपासणी करणे, पाण्यास आवश्यक ती ट्रिटमेंट देणे, वितरण व्यवस्थेतील पाणी तक्रारीचे निराकरण करणे, पाण्याच्या संबंधीचा अहवाल पाठविणे इ. कामे केमीस्ट यांच्याकडून करुन घेणेत येत असून सध्या जलशुध्दीकरण केंद्रावर केमीस्ट अभिनामाचे फक्त एकच पद उपलब्ध असल्याने मनपाच्या हद्दीत नव्याने आलेल्या क्षेत्रवाढीमुळे वाढीव कामाकरिता केमीस्ट या अभिनामाचे अजून एक पद निर्माण करणे आवश्यक आहे त्याकरिता केमीस्ट अभिनामाचे एक नवीन पद यापुर्वीच्या केमीस्ट पदाच्या र.रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणी मध्ये निर्माण करणेस व ते पद पदोन्नतीने भरणेस व त्याकरिता पदोन्नतीसाठी मनपा सेवेत असिस्टंट केमीस्ट या पदावर किमान आठ वर्षे सेवा पुर्ण याप्रमाणे अर्हता ठेवणेस मान्यता देणेत येत आहे ठराव क्र.६८६ दिनांक ४/७/२००९ अन्वये कार्यालय अधिक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत मान्यता देण्यात आली असून त्यांस पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे. प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यालय अधिक्षक पदावरील कर्मचारी की जे पदवीधर आहेत व पदावर ७ वर्षे सेवा झाली आहे. अशांना पदोन्नती देऊन भरण्याबाबत मान्यता आहे. त्याऐवजी प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यालय अधिक्षक पदावरील ७ वर्षे सेवेची अट शिथील करुन कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत असून त्यांस विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी महासभेच्या मान्यतेनुसार मा.आयुक्त यांनी तात्काल कार्यवाही करावी शासन मंजूरी लागत असल्यास शासन उमेदमान्यतेवर पदोन्नती देण्यात यावी.

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/६७७/०९ दि.२०/०८/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९४७४ दिनांक २७/१०/२००९

मनपाचे सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-१९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील

अनुक्रमांक-२६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू. १० कोटी मधून र.रू.५८,००,०००/- कपात करून तसेच अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-१) पान क्रमांक-१८ ते १९ मधील अ.क्र.५ वाहन खरेदी या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू.३,००,००,०००/- मधून र.रू.२५,००,०००/- कपात करून मनपाचे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक- ७६ ते ७९ मधील आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-१२ साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर एकूण र.रू.८३,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत तळवडे पासून चऱ्होली येथील मैलाशुध्दीकरण प्रकल्पापर्यंत इंद्रायणी नदीचे कडेने मुख्य गुरुत्व जलनिःसारण वाहिनी नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणेत येत आहे. त्यामधील १२०० मिटर गुरुत्व नलिका हि मनपाचे हद्दीबाहेरील

आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीमधून नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणे आवश्यक आहे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ कलम ८९ नुसार मनपा हद्दीबाहेरील सदर १२०० मिटर गुरुत्व नलिका आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीमधून नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणेस व त्यासाठी येणारा खर्च र.रु.५४,००,०००/- यास मान्यता देणेत यावी. महापालिकेच्या सन २००९-१० चे अंदाजपत्रकात पान क्र.२९७ अ.क्र.१ पथ अ) खडीमुरुमाचे या लेखाशिर्षाखाली भोसरी प्रभाग क्र.६ मधील ताब्यात आलेल्या जागेमधील रस्ते तयार करणे व इतर ठिकाणी रस्त्याची दुरुस्ती करणे या नावाने तरतुद करणेत आलेली आहे. परंतु सदर कामाची मंजुरी भोसरी वार्ड क्र.१९ मधील आरक्षण क्र.४१५ (मुलांचे खेळाचे मैदान) ला सिमाभिंत बांधणे या नावाने घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सन२००९/१० चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे कामाचे नावात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. लेखाशिर्ष अ) खडीमुरुमाचे रस्ते पान क्र.२९७ अ.क्र.०१ अंदाजपत्रकातील नांव- भोसरी प्र.क्र.६ मधील ताब्यात आलेल्या जागेमधील रस्ते तयार करणे व इतर ठिकाणी रस्त्याची दुरुस्ती करणे, दुरुस्त नांव- भोसरी वार्ड क्र.१९ मधील आरक्षण क्र.४१५ (मुलांचे खेळाचे मैदान) ला सिमाभिंत बांधणे तरी सदर विषयास मान्याता देणेत यावी. सन २००९-१० चे अंदाजपत्रकात पिंपळे निलख बाणेर पुलाचा जोडरस्ता ते स्मशानभुमीपर्यंतचा रस्ता तयार करणे या कामाचा समावेश नाही. सदरचे काम तातडीने करावयाचे आहे. या कामाचा सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील ड मुख्यालयाचे खडीमुरुमाचे रस्ते या लेखाशिर्षामध्ये समावेश करणेत यावा व त्यास र.रु.५० लाख इतकी तरतुद करणेत यावी. उपरोक्त कामावर तरतुद करणे व

**सदरची तरतुद कोणत्या लेखाशिर्षावरुन वर्ग करावयाची याचे प्रपत्र ब सोबत जोडले आहे.**

**प्रपत्र ब**

| अ. क्र. | लेखाशिर्ष सन २००९-१० ची तरतुद | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र./ अ.क्र. | सन २००९-१० ची मुळ तरतुद | वाढ तरतुद | घट तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तरतुद करावयाची कामे | | | | |
| २ | खडीमुरुमाचे रस्ते | पिंपळे निलख बाणेर पुलाचा जोडरस्ता ते स्मशानभुमीपर्यंतचा रस्ता तयार करणे | ० | ० | ५०,००,०००/- | ० |
| | | या कामामधुन तरतुद वर्ग करावयाची कामे | | | | |
| ३ | रेल्वे मार्गावरील पुल | बिजलीनगर येथे गिरिराज हौसिंग सोसा. येथे रेल्वे पादचारी पुल बांधणे | १५/६ | ५३,८५,०००/- | ० | ५०,००,०००/- |

**उपरोक्त विषयास मा.स्थायी समिती ठराव क्र.९१०५ दि.२४/०८/२००९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता देणेत यावी. वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथे वाघेश्वर मंदीराजवळ कुस्तीचा आखाडा बांधणे हे काम करणे ऐवजी चऱ्होली येथील स्मशान भुमीचे बांधकाम करणे व नुतनीकरण करणे व भाजीमंडईचे शेड करणेबाबत (निविदा क्रमांक १३/२०-२००८-०९, ठेकेदाराचे नांव- मे.श्री.गणेश कन्स्ट्रक्शन) वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथे वाघेश्वर मंदीराजवळ कुस्तीचा आखाडा बांधणे याकामाचे आदेश देणेत आलेले आहेत. परंतु सदरची जागा चिंचवड देवस्थान यांची असलेने सदर जागेबाबत चिंचवड देवस्थान यांनी हरकत घेतलेली आहे. त्यामुळे सदर काम करणे सध्या शक्य होणार नाही. त्यामुळे सदरचे काम रद्द करावे लागणार असल्याने अंदाजपत्रकीय तरतुद ही वापरली जाणार नाही. त्यामुळे सदरच्या कामाऐवजी मौजे चऱ्होली येथे स्मशानभुमीचे बांधकाम करणे व नुतनीकरण करणे तसेच भाजीमंडईला शेड करणे हे काम करणेत यावे. मौजे चऱ्होली इंद्रायणीनदी काठी मनपाचे**

स्मशानभुमी शेड आहे सदर शेड पावसाळ्यात पाण्यात जाते चऱ्होलीगाव तसेच आजुबाजुचे गावचे सर्व लोकांसाठी हा एकमेव स्मशानभुमी आहे. परंतु सदर स्मशानभुमी कोठल्याही प्रकारच्या सुविधा नाहीत तसेच चऱ्होली व आसपासच्या अनेक लोकांची बऱ्याच वर्षापासुनची नविन स्मशाभुमी करण्याविषयी मागणी आहे. सदर कामामुळे स्थानिक नागरीकांची सोय होईल तसेच सदर कामाचा मनपाने बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखड्यानुसार त्यामधील महत्वाचा भाग या कामातुन करणेत यावा व उर्वरित काम सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करणेत यावे त्यास मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.११ या प्रभागात अनेक उपनगरांमध्ये पाणी पुरवठ्यासाठी अंतर्गत जलवाहिन्या अस्तित्वात नाहीत प्रभाग क्र.११ वडमुखवाडी येथे पाणीपुरवठा विषयक कामे करणे (पाईपलाईन पुरविणे व टाकणे) कामी र.रु.१,००,००,०००/- (एक कोटी) स मान्यता देणेत यावी. पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील खाली तक्त्यामध्ये नमूद केलेली कामे चालू असून त्यांचा समावेश सन २००९-१० च्या अंदाजपत्रकामध्ये नाही. सदरील कामांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९०६२ दि.२४/०८/०९ अन्वये सन २००९-१० चे अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्र कातील पान क्र./अ.क्र. | सन २००९-१० मध्ये असलेली तरतूद र.रु. | सन २००९-१० मध्ये आवश्यक र.रु. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील तपोवन रस्त्याच्या दोन्ही बाजूने व इतर ठिकाणी बंद पाईप गटर व पेव्हींग ब्लॉक बसविणे | विशेष योजना | -- | ० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | -- |
| २ | पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील वाघेरे कॉलनी रस्त्याच्या दोन्ही बाजूने व इतर | विशेष योजना | -- | ० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ठिकाणी बंद पाईप गटर व फुटपाथ करणे | | | | | | |
| ३ | पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र.१५४ येथे जलतरण तलाव बांधणे | विशेष योजना | २१/२ | ८१,९९,०००/- | ५६,९९,०००/- | -- | २५,००,०००/- |
| | एकूण र.रु. | | | ८१,९९,०००/- | ८१,९९,०००/- | २५,००,०००/- | २५,००,०००/- |

तरी वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरणास व वरील दोन कामांची नावे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत यावी. "लोकशाहीचे मंदिर हे सुंदर । संभाषण घडो मधुर निरंतर ।। सत्य, न्याय, शांतीचा राहो आदर । जनहित विकासाचे, गाठू उत्तुंग शिखर ।।" हे सुभाषित म.न.पा. नवीन सभागृहात लावणेस मान्यता देणेत यावी.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब,उपसूचनेस मी अनुमोदन देतो.
मा.संतोष बारणे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मनपाचे सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-१९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक- २६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रु.१० कोटी मधून र.रु.१ कोटी रुपये वॉर्ड क्रमांक ८४ बेलठिकानगर हेड दगडी फरशी व फुटपाथ या शिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.बाबु नायर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

वॉ.क्र.७८ तापकीरनगर ड प्रभाग मनपा कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरीता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब विजवाहिन्या तसेच अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरणारे विद्युत वाहिनी काढून अंदाजपत्रक १०-११ मध्ये विद्युत विषयक कामासाठी र.रु.१ कोटी २५ लाख मुळ अंदाजपत्रकीय लेखाशिर्षामध्ये तरतुद करणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब,उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, याठिकाणी वर्गीकरणाचा विषय आहे ज्यावेळी महापालिकेचा बजेटचा विषय सभागृहासमोर मांडला गेला त्यावेळी बजेटवर चर्चा झाल्यानंतर सभागृहामध्ये निर्णय झाला की कुठल्याही प्रकारच्या उपसूचना घ्यायच्या नाहीत. जे काही विषय असतील ते स्थायी समितीच्या माध्यमातून स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर सभागृहामध्ये येतील. तीन वर्षात

हे बजेट एकही उपसूचना न घेता मान्य झालेले आहे. स्थायी समिती समोर अनेक सदस्यांनी अशाप्रकारचे विषय आणले व ते स्थायी समितीमध्ये घेण्यात आले परंतू आमच्या सारख्या सदस्यांचे विषय जानुनबुजून स्थायी समितीने टाळण्याचे काम केले. आठ महिन्याचा बजेटचा कालावधी संपत आलेला आहे. याकालावधी मध्ये सदस्यांना वॉर्डामधील कामासाठी दोन ते अडीच कोटीची तरतूद मिळालेली आहे. आमच्या सारख्या सदस्यांच्या वॉर्डात मुरमाची गाडी टाकायची म्हणलेतरी तरतूद नाही. माझ्यावर अन्याय होतो त्या संदर्भात मी बोलणार आहे. सुरवातीलाच मला हा विषय मांडायचा होता परंतु आपण मला टाळले, माझे प्रश्न सुध्दा नाकारले. यासंदर्भात मला असे सांगायचे आहे की लोकशाहीचा गळा घोटण्यात आला आहे. कारण द्यायला पाहिजे होते ते दिलेले नाही. फेब्रूवारी-०७ ला महापालिकेची निवडणूक झाली आणि सदस्य निवडून आले, त्यावेळेला मोहननगर परिसरामधील स.नं. १३५ ही जागा सांस्कृतीक भवनासाठी आरक्षीत होती. जुन्या सभागृहामध्ये विषय मंजूर झालेला होता परंतू एमआयडीसीचा प्लॅन पास झालेला नव्हता. फेब्रूवारी-०७ ला नवीन सभागृह अस्तित्वात आले, महापालिका सभेची मान्यता मिळाली, एमआयडीसीच्या प्लॅनला मान्यता मिळाली. मी आयुक्ताना आणि त्यावेळेच्या पदाधिका-यांना सांगीतले की माझ्या वॉर्डातील अडीच कोटीची तरतूद तीकडे वर्ग करा व तसे त्यांनी व आयुक्तांनी मान्य केले. ८५ लाखाची तरतूद बजेटमध्ये ठेवण्यात आलेली असताना हा विषय माझ्या वॉर्डातील असताना बीओटीच्या मिटिंगमध्ये मला कल्पना न देता हा विषय बीओटीमध्ये घेणेत आला. आझमभाई पानसरे आणि पक्षनेते यांनी हा विषय बीओटीला देण्याचा निर्णय घेतला. माझ्या वॉर्डातील इतर कामाची तरतूद कमी झालीतरी चालेल परंतु सांस्कृतीक भवन झाले पाहिजे अशाप्रकारची भूमिका घेवून मी आयुक्तांना विनंती केली व त्यास त्यांनी मान्यता दिली. परंतू याठिकाणी परस्पर विषय घेऊन बीओटीवर देण्याचा निर्णय घेतला. पीपीपी आणि बीओटीचे फ्याड महापालिकेत प्रचंड वेगाने येते आहे. ही लोककल्याणकारी संस्था आहे. अशाप्रकारे बीओटीवर सगळे प्रकल्प करणार असालतर, पीपीपीच्या माध्यमातून शहराचा विकास करणार असालतर या महापालिकेच्या अस्तित्वाचे प्रश्नचिन्ह झाल्याशिवाय राहणार नाही. अशाप्रकारचे सत्तारुढ पक्षाच्या वतीने एखादया नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये अतिक्रमण करुन परस्पर निर्णय घेणे गंभीर आहे, हा अन्याय आहे. वर्गीकरणाचे विषय मंजूर करा परंतु या बीओटीच्या प्रकल्पासंदर्भात बीओटीचे जे अधिकारी असतील त्यांनी याठिकाणी हा माझ्या वॉर्डातील विषय असताना असा परस्पर निर्णय का घेतला याचे कारण काय आहे आणि बीओटीवरच तो राबविणार का याचे स्पष्टीकरण दयावे. ८५ लाखाच्या तरतूदीचे काय करणार आहात हे सांगावे. ती तरतूद कुठे वळवली जाणार हे सांगावे. सभागृहाने हा विषय गांभीर्याने घ्यावा. अशाप्रकारचा अन्याय आज माझ्यावर झाला आहे उदया तूमच्यावर होऊ शकतो. या विषयावर स्पष्टीकरण द्यायला सांगावे याची माहिती द्यावी ८५ लाखाचा विषय आहे,माझ्या वॉर्डातील सगळे काम बंद झालेले आहे. काल माझ्या वॉर्डात वॉर्डसभा झाली बीओटीला माझ्या वॉर्डातील सर्व

नागरीकांनी विरोध केलेला आहे. आपण कृपया संबंधीत अधिका-यांना या संदर्भात स्पष्टीकरण द्यायला सांगावे म्हणजे मला ८५ लाखाच्या संदर्भात बोलता येईल व त्यानंतरच या विषयावर निर्णय घ्यावा.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, गेल्या सव्वा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये आपण सभागृह व्यवस्थीत चालविले आहे व सर्वांना समान न्याय दिलेला आहे. आपल्याला पुढील कारकिर्दीकरिता शुभेच्छा देतो. बजेट होऊन आठ महिने झ ालेले आहेत. बजेट मांडत असताना सभासदांच्या उपसूचना प्रथमच घेतलेल्या नाहीत. स्थायी समितीमध्ये बजेट आले त्यावेळेला आयुक्तांनी अलिखीत आश्वासन दिले होते की तुमच्या सोळा जणांच्या एक-एक कोटीच्या उपसूचना घेऊ पण त्या घेतल्या नाहीत. अनेक सभासदांचे काम खोंळंबलेले आहे आज ज्या उपसूचना स्विकारत आहोत त्याला पुढच्या चार महिन्यात तरतूद उपलब्ध होईल का. अनेक सभासदांना उपसूचना द्यायच्या आहेत त्या स्विकारणार असालतर हा विषय तहकूब करुन पुढच्या मिटिंगला सभासदांच्या उपसूचना घ्याव्यात.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, नियमाप्रमाणे सभासदांच्या वॉर्डातील विषय स्थायी समितीकडे गेले त्यांनी मान्यता दिल्यानंतर आयुक्तांकडे गेले,लोंढे साहेबाकडे गेले,संबंधीत इंजिनिअरकडे गेले व त्यांनी मान्य केले त्याच या उपसूचना आहेत. सर्व उपसूचनांचे विषय स्थायी समिती अध्यक्षानी संबंधीत विभागाकडे देवून हे विषय आलेले आहेत.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डातील विषय अशाच प्रोसीजरला पाठविलेला होता तो का आला नाही.

मा.महापौर :- स्थायी समितीने याच्यावर फेरविचार करावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, नगरसेवकांनी आपआपल्या वॉर्डातील उपसूचना द्याव्यात हे आपण ॲक्सेप्ट केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की ही कामे यावर्षी होणार आहेत का. बजेटमध्ये प्रोव्हीजन आहे त्या कामाची टेंडर सूध्दा निघालेली नाहीत. कामगारांना बोनस द्यायला पैसे नाहीत एवढी परिस्थिती बेकार आहे बोनसचे पैसे प्रथम द्यावेत. उपसूचनांवर कार्यवाही करण्यासाठी पैसे आहेत का. महापालिकेत मार्च पासून आतापर्यंत ८० कोटीचे पार्टिला पेमेंट केलेले नाही त्यामुळे पार्टिने कामे थांबविलेली आहेत. सहा-सात महिने झाले पैसे मिळाले नाहीत त्यामुळे नवीन कामे सुरु करत नाहीत. महापालिकेच्या तिजोरीमध्ये पैसे नाहीत हे अधिकारी मान्य सूध्दा करत नाहीत. वर्गीकरण करुन आपण विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या मधुन पैसे घेतो. ते महत्वाचे नाही का. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढायला नको का. त्या हेडमधुन का वर्ग करतो. माझे उपसूचनेला ऑब्जेक्शन नाही, आमच्या वॉर्डातील सुध्दा उपसूचना घ्या. पण हे कामे होणार का, उदया पेपरमध्ये येणार ते नागरीक वाचणार आणि कामे दोन वर्षे होणार नाहीत. आज परिस्थिती फार बेकार आहे. जकातीचे उत्पन्न सुध्दा १५० कोटीने कमी झालेले आहे अशा परिस्थितीत हे कामे होणार का. स्थायी समितीने मान्यता

दिलेली आहे, चिफ अकौंटंटने मान्यता दिली आहे हे मान्य आहे. ज्या कामाची बजेटमध्ये प्रोव्हीजन केलेली होती ती कामे अजून का झाली नाहीत कर्मचा-याना बोनस सुध्दा दिलेला नाही. अशी परिस्थिती का आली. स्थापत्य विभागामध्ये २००६ ते २००९ या काळात ५०० कोटी ऐवजी १५०० कोटीच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत. कामे करण्यासाठी तिजोरीमध्ये पैसे आहेत का आणि बजेटमध्ये जी प्रोव्हीजन केली ती कामे का सुरु झाली नाहीत, टेंडर का काढले नाहीत. १०० कोटीची बीले थकबाकी आहेत, परिस्थिती गंभीर आहे का नाही हे सांगावे. पहिला कामगारांना बोनस दयावा व याचा खुलासा करावा.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, आताच कुमार साहेबांनी वर्गीकरणाबद्यल विषय मांडला. सत्तारुढ पक्षावर खुले आरोप करणे चुकिचे आहे. नगररचनाचे जे साहेब आहेत त्यांनी येणा-या महापालिका सभेमध्ये रिझर्व्हेशनच्या ज्या ज्या जागा आहेत त्याचा खुलासा करावा. माझ्या वॉर्डातील प्रायमरी शाळा आहे त्यासंदर्भात नगररचना विभागाने त्या जागेवर काय केले. गॅझेट झालेले आहे. आकुर्डी भागामध्ये महापालिकेची एकच शाळा करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी लोकवस्ती ४० ते ५० हजार आहे. प्रायमरी शाळेच्या जागेमध्ये प्रायव्हेट घर,व्यवसाय चालू आहेत. त्या जागेवर काही बदल झालेला असेलतर ठिक आहे परंतु प्रायव्हेट व्यवसायीकांनी अधिका-या मार्फत किंवा इतर खोटे कागदपत्र सादर करुन त्याठिक्‍णी काही केले असेलतर त्यांच्यावर कार्यवाही का करत नाहीत. बजेट पास होऊन किती दिवस झाले तरी कामे का होत नाहीत. वॉर्ड क्रमांक ५२ मध्ये शाळेच्या जागा किती आहेत आणि इतर काय काय आरक्षणे आहेत गॅझेट झाल्यानंतर राज्यशासनाने, केंद्रशासनाने काय काय चेंजेस केले आहेत याची लेखी माहिती दयावी. या विषयावर परवा दिवशी मुंबईला प्रेस कॉन्फरन्स सुध्दा झालेली आहे. अधिका-यांना मी ई-मेल सुध्दा केलेले आहेत.

माझ्या वॉर्डातील प्रकल्पावर अंमलबजावणी का होत नाही. माझ्या वॉर्डातील कामे का होत नाहीत. असे व्हायला नाही पाहिजे. मार्चला आपल्या बरोबर मिटिंग झाली अडीच तास चालली त्यावर काही कार्यवाही झाली का. त्यानंतर माझ्यावर हल्ला सुध्दा झाला. नागरीकांनी मला निवडून दिलेले आहे.

मा.महापौर :- प्रशासनाला मी सूचना करते यांच्या वॉर्डासंबंधी लेखी माहिती दयावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.मच्छिंद्र तापकीर व मा.राजू मिसाळ यांची, मा.संतोष बारणे व मा. बाबू नायर यांची,मा.योगेश बहल व मा.जितेंद्र ननावरे यांची उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर :- प्रशासनाने संबंधीत नगरसेवकांच्या प्रश्नाचे उत्तर दयावे.

मा.लोंढे :- मा.महापौर साहेब, साधारणपणे जकात या वर्षामध्ये ७८० कोटी होईल असा अंदाज गृहीत धरला होता परंतू ऑक्टोबर अखेर ३३६ कोटी जकात जमा

झालेली आहे. १२० कोटीची जकात कमी झालेली आहे. आताची जी परिस्थिती आहे ती साधारणपणे ३३६ कोटी जकात धरुन ५०५ कोटी ऑक्टोबर अखेर उत्पन्न आणि ५०५ कोटी खर्च झालेला आहे. ठेवी १०० कोटीच्या शिल्लक आहेत.

मा.उगिले :- मा.महापौर साहेब, ठेकेदारांची बिले प्रलंबीत आहेत, दोन लेखाशिर्ष आहेत, विशेष योजनेच्या लेखाशिर्षाखालील आहेत त्याची अंदाजीत रक्कम ८० कोटीच्या जवळपास आहे. ही एप्रिल-०९ च्या नंतरची बीले पेन्डींग आहेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, जानेवारी,फेब्रूवारी,मार्च मध्ये बीले सादर केली होती त्यावर तुम्ही तारीख बदलून घेतली आहे. ही पुर्वी केलेल्या कामांची बीले आहेत. ८० कोटीची ही बीले आहेत तरतूद नाही म्हणून तुम्ही ॲक्सेप्टही केलेले होते. मागच्या वेळेस ॲडीशनल सिटि इंजि.सावळे यांनी सांगीतले होते की ३१ मार्च २००९ मध्ये तरतूद नाही म्हणून ही मागची बीले पेन्डींग ठेवलेली आहेत आणि आज चुकिचे उत्तर देता आहात ही बीले मार्च-०९ पर्यंतच्या कामाची आहेत. खोटे उत्तर दिल्याबद्यल सिटि इंजिनिअरवर कार्यवाही करण्यात यावी, त्यांनी राजीनामा दयावा, तीन वर्षे अधिका-यांनी महापालिकेची लुटमार केलेली आहे. कर्मचा-यांना बोनस देण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत.

मा.उगिले :- मा.महापौर साहेब, ८० कोटीची बीले पेन्डींग आहेत ही बीले एप्रिल नंतरची आहेत. आमच्याकडे ज्या तारखेला आले त्याप्रमाणे ते पेमेंन्ट साठी सिरीअलने लावलेले आहेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, काम मार्च अगोदर झालेले आहे तरतूद नाही म्हणून बील काढलेले नाही. चुकिचे उत्तर दिल्याबद्यल संबंधीत सिटी इंजिनिअरवर कार्यवाही व्हावी.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, प्रशासनाकडून खुलासा करावी की महापालिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे व त्याची लेखी स्वरुपात माहिती पुढच्या जीबीच्या अगोदर सभासदांना घरपोच किंवा याठिकाणी दयावी. पेन्डींग बील किंवा कर्ज असेलतर त्याची सुध्दा लेखी स्वरुपात माहिती मिळावी असे आपण आदेश दयावेत. आपल्यामागे खुर्च्या ठेवलेल्या आहेत त्याठिकाणी बोदडे बसलेले आहेत त्यांना सभागृहाच्या नियमाप्रमाणे बसण्याची परवानगी आहे का याचा खुलासा करावा.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, याठिकाणी कुमार साहेबांसारख्या ज्येष्ठ सभासदांसमोर खोटे उत्तर देणे गंभीर बाब आहे आणि म्हणून या संपुर्ण प्रकारणाची चौकशी करण्याचे आदेश दयावेत. सिटि इंजिनिअर यांनी खोटे उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाहीचे आदेश द्यावेत. माझ्या परस्पर आम्हांला काहीही माहिती न देता सभागृहातील पक्षनेते जगदीश शेट्टी आणि आझमभाई पानसरे यांनी माझ्या वॉर्डातील विषय बीओटीवर देण्याचा निर्णय घेतलेला आहे.अशाप्रकारचा निर्णय कसा काय घेतला गेला आणि माझ्या वॉर्डातील ८५

लाखाच्या तरतूदी संदर्भात प्रशासनाची काय भूमिका आहे. आमचा बीओटीवर संास्कृतीक भवन करण्यास विरोध आहे व नागरीकंाचाही विरोध आहे यासंदर्भात प्रशासनाची भूमिका काय आहे हे सांगावे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, गेल्या तीन वर्षामध्ये स्थापत्य विभागामध्ये जे काम झाले त्याची चौकशी करावी. नगरसेवकांच्या वॉर्डातील कामे होत नाहीत याला अधिकारी जबाबदार आहेत. २००६-०९ पर्यंत झालेल्या कामाची चौकशी करावी व संबंधीत अधिका-यावर कार्यवाही करावी. बजेटपेक्षा जास्त वर्कऑर्डर दिल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे गेल्या तीन वर्षामध्ये तरतूद नसताना जास्त काम केलेले आहे. २००६ ते २००९ पर्यंत बजेट मॉनेटरींग केलेले नाही. तरी संबंधीत स्थापत्य विभागाचे एचओडीवर चार्जशीट ठेवण्यात यावे. आजच्या फायनानशिअल कन्डीशनला त्यावेळेसचे आयुक्त आणि सिटि इंजिनिअर जबाबदार आहेत.

मा.महापौर :- प्रशासनास सूचना करण्यात येते की, यासंबंधीत तीन वर्षाची स्थापत्य विभागाकडून झालेल्या कामाची चौकशी करावी व संबंधीत अधिकारी व सिटि इंजिनिअरवर दोषी आढळलेतर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच आर्थिक परिस्थितीची माहिती मागीतलेली आहे त्याबाबतीत लेखी स्वरुपात माहिती सर्व नगरसेवकंाना देण्यात यावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७३४ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.मसाभां/५/कावि/६७७/०९ दि.२०/०८/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९४७४ दिनांक २७/१०/२००९

मनपाचे सन २००९-२०१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक-१९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-२६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू. १० कोटी मधून र.रू.५८,००,०००/- कपात करून तसेच अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-१) पान क्रमांक-१८ ते १९ मधील अ.क्र.५ वाहन खरेदी या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रू.३,००,००,०००/- मधून र.रू.२५,००,०००/- कपात करून मनपाचे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक- ७६ ते ७९ मधील आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक-१२ साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षावर एकूण र.रू.८३,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत तळवडे पासून चऱ्होली येथील मैलाशुध्दीकरण प्रकल्पापर्यंत इंद्रायणी नदीचे कडेने मुख्य गुरुत्व जलनिःसारण वाहिनी नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणेत येत आहे. त्यामधील १२००

मिटर गुरुत्व नलिका हि मनपाचे हद्दीबाहेरील आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीमधून नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणे आवश्यक आहे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ कलम ८९ नुसार मनपा हद्दीबाहेरील सदर १२०० मिटर गुरुत्व नलिका आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीमधून नैसर्गिक उताराप्रमाणे टाकणेस व त्यासाठी येणारा खर्च र.रु.५४,००,०००/- यास मान्यता देणेत येत आहे. महापालिकेच्या सन २००९-१० चे अंदाजपत्रकात पान क्र.२९७ अ.क्र.१ पथ अ) खडीमुरुमाचे या लेखाशिर्षाखाली भोसरी प्रभाग क्र.६ मधील ताब्यात आलेल्या जागेमधील रस्ते तयार करणे व इतर ठिकाणी रस्त्याची दुरुस्ती करणे या नावाने तरतुद करणेत आलेली आहे. परंतु सदर कामाची मंजुरी भोसरी वार्ड क्र.१९ मधील आरक्षण क्र.४१५ (मुलांचे खेळाचे मैदान) ला सिमाभिंत बांधणे या नावाने घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सन२००९/१० चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे कामाचे नावात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. लेखाशिर्ष अ) खडीमुरुमाचे रस्ते पान क्र.२९७ अ.क्र.०१ अंदाजपत्रकातील नांव- भोसरी प्र.क्र.६ मधील ताब्यात आलेल्या जागेमधील रस्ते तयार करणे व इतर ठिकाणी रस्त्याची दुरुस्ती करणे, दुरुस्त नांव- भोसरी वार्ड क्र.१९ मधील आरक्षण क्र.४१५ (मुलांचे खेळाचे मैदान) ला सिमाभिंत बांधणे तरी सदर विषयास मान्यता देणेत येत आहे. सन २००९-१० चे अंदाजपत्रकात पिंपळे निलख बाणेर पुलाचा जोडरस्ता ते स्मशानभुमीपर्यंतचा रस्ता तयार करणे या कामाचा समावेश नाही. सदरचे काम तातडीने करावयाचे आहे. या कामाचा सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील ड मुख्यालयाचे खडीमुरुमाचे रस्ते या लेखाशिर्षामध्ये समावेश करणेत यावा व त्यास र.रु.५० लाख इतकी तरतुद करणेत यावी. उपरोक्त कामावर तरतुद करणे व सदरची तरतुद कोणत्या लेखाशिर्षावरुन वर्ग करावयाची याचे प्रपत्र ब सोबत जोडले आहे.

**प्रपत्र ब**

| अ. क्र. | लेखाशिर्ष सन २००९-१० ची तरतुद | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | पान क्र./ अ.क्र. | सन २००९-१० ची मुळ तरतुद | वाढ तरतुद | घट तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तरतुद करावयाची कामे | | | | |
| २ | खडीमुरुमाचे रस्ते | पिंपळे निलख बाणेर पुलाचा जोडरस्ता ते स्मशानभुमीपर्यंतचा रस्ता तयार करणे | ० | ० | ५०,००,०००/- | ० |
| | | या कामामधुन तरतुद वर्ग करावयाची कामे | | | | |
| ३ | रेल्वे मार्गावरील पुल | बिजलीनगर येथे गिरिराज हौसिंग सोसा. येथे रेल्वे | १५/६ | ५३,८५,०००/- | ० | ५०,००,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुल | पादचारी पुल बांधणे | | | | |

उपरोक्त विषयास मा.स्थायी समिती ठराव क्र.९१०५ दि.२४/०८/२००९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथे वाघेश्वर मंदीराजवळ कुस्तीचा आखाडा बांधणे हे काम करणे ऐवजी चऱ्होली येथील स्मशान भुमीचे बांधकाम करणे व नुतनीकरण करणे व भाजीमंडईचे शेड करणेबाबत (निविदा क्रमांक १३/२०-२००८-०९, ठेकेदाराचे नांव- मे.श्री.गणेश कन्स्ट्रक्शन) वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथे वाघेश्वर मंदीराजवळ कुस्तीचा आखाडा बांधणे याकामाचे आदेश देणेत आलेले आहेत. परंतु सदरची जागा चिंचवड देवस्थान यांची असलेने सदर जागेबाबत चिंचवड देवस्थान यांनी हरकत घेतलेली आहे. त्यामुळे सदर काम करणे सध्या शक्य होणार नाही. त्यामुळे सदरचे काम रद्द करावे लागणार असल्याने अंदाजपत्रकीय तरतुद ही वापरली जाणार नाही. त्यामुळे सदरच्या कामाऐवजी मौजे चऱ्होली येथे स्मशानभुमीचे बांधकाम करणे व नुतनीकरण करणे तसेच भाजीमंडईला शेड करणे हे काम करणेत यावे. मौजे चऱ्होली इंद्रायणीनदी काठी मनपाचे स्मशानभुमी शेड आहे सदर शेड पावसाळ्यात पाण्यात जाते चऱ्होलीगाव तसेच आजुबाजुचे गावचे सर्व लोकांसाठी हा एकमेव स्मशानभुमी आहे. परंतु सदर स्मशानभुमी कोठल्याही प्रकारच्या सुविधा नाहीत तसेच चऱ्होली व आसपासच्या अनेक लोकांची बऱ्याच वर्षापासुनची नविन स्मशाभुमी करण्याविषयी मागणी आहे. सदर कामामुळे स्थानिक नागरीकांची सोय होईल तसेच सदर कामाचा मनपाने बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखड्यानुसार त्यामधील महत्वाचा भाग या कामातुन करणेत यावा व उर्वरित काम सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करणेत यावे त्यास मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र.११ या प्रभागात अनेक उपनगरांमध्ये पाणी पुरवठ्यासाठी अंतर्गत जलवाहिन्या अस्तित्वात नाहीत प्रभाग क्र.११ वडमुखवाडी येथे पाणीपुरवठा विषयक कामे करणे (पाईपलाईन पुरविणे व टाकणे) कामी र.रु.१,००,००,०००/- (एक कोटी) स मान्यता देणेत येत आहे. पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील खाली तक्त्यामध्ये नमूद केलेली कामे चालू असून त्यांचा समावेश सन २००९-१० च्या अंदाजपत्रकामध्ये नाही. सदरील कामांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९०६२ दि.२४/०८/०९ अन्वये सन २००९-१० चे अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्र कातील पान क्र./अ.क्र. | सन २००९-१० मध्ये असलेली तरतूद र.रु. | सन २००९-१० मध्ये आवश्यक र.रु. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील तपोवन रस्त्याच्या दोन्ही बाजूने व इतर ठिकाणी बंद | विशेष योजना | -- | ० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाईप गटर व पेव्हींग ब्लॉक बसविणे | | | | | | |
| २ | पिंपरी वाघेरे प्र.क्र.७४ मधील वाघेरे कॉलनी रस्त्याच्या दोन्ही बाजूने व इतर ठिकाणी बंद पाईप गटर व फुटपाथ करणे | विशेष योजना | -- | ० | १२,५०,०००/- | १२,५०,०००/- | -- |
| ३ | पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र.१५४ येथे जलतरण तलाव बांधणे | विशेष योजना | २१/२ | ८१,९९,०००/- | ५६,९९,०००/- | -- | २५,००,०००/- |
| | एकूण र.रु. | | | ८१,९९,०००/- | ८१,९९,०००/- | २५,००,०००/- | २५,००,०००/- |

तरी वरीलप्रमाणे तरतुद वर्गीकरणास व वरील दोन कामांची नावे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे. “लोकशाहीचे मंदिर हे सुंदर । संभाषण घडो मधुर निरंतर ।। सत्य, न्याय, शांतीचा राहो आदर । जनहित विकासाचे, गाठू उत्तुंग शिखर ।।” हे सुभाषित म.न.पा. नवीन सभागृहात लावणेस मान्यता देणेत येत आहे. मनपाचे सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील (पुस्तक क्रमांक-२) पान क्रमांक- १९६ ते १९९ मधील माध्यमिक शिक्षण विभाग, मुख्य कार्यालय यांचेकडील अनुक्रमांक- २६ विद्यार्थी गुणवत्ता वाढ विकास या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली तरतूद र.रु.१० कोटी मधून र.रु.१ कोटी रुपये वॉर्ड क्रमांक ८४ बेलठिकानगर हेड दगडी फरशी व फुटपाथ या शिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे. वॉ.क्र.७८ तापकीरनगर ड प्रभाग मनपा

कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरीता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब विजवाहिन्या तसेच अंतर्गत रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरणारे विद्युत वाहिनी काढून अंदाजपत्रक १०-११ मध्ये विद्युत विषयक कामासाठी र.रु.१ कोटी २५ लाख मुळ अंदाजपत्रकीय लेखाशिर्षामध्ये तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, मागे बोदडे बसलेले आहेत त्यांना बसण्यास परवानगी आहे का हे सांगावे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७३५ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१६४/०९ दि.२३/१०/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९५७९ दिनांक १०.११.२००९

मनपाच्या विद्युत-भुगयो विभागाकरीताच्या क अंदाजपत्रकातील भांडवली खर्चाअंतर्गतच्या भुगयो विद्युत-नविन कामे व भुगयो विद्युत-देखभाल दुरुस्ती कामांच्या तरतुदींचे अंतर्गत वर्गीकरण करुन उपलब्ध होणारी प्रपत्र 'अ' नुसार र.रू.१,६०,००,०००/- तरतुद चालन देखभाल दुरुस्तीच्या अत्यावश्यक कामांकरीता प्रपत्र 'ब' नुसार वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, बोदडे यांना याठिकाणी बसण्यास परवानगी आहे का.

मा.महापौर :- नगरसचिव उत्तर देतील.

(गोंधळ)

मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब,सभेच्या कार्यपत्रिकेवर जे विषय असतात त्यासंदर्भात माहिती देण्याकरिता आयुक्तांना जो स्टाफ आवश्यक असतो तो स्टाफ ते बोलावतात.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, आयुक्तांनी त्यांना बोलावले होते का हे सांगावे नसता त्यांच्यावर कार्यवाही करावी.

मा.अति.आयुक्त :- मा.महापौर साहेब, नगरसचिव यांनी सांगीतलेले बरोबर आहे. त्यांनी परवानगी घेतलेली नाही परंतू महापौरांचे पीए म्हणून ते दरवेळेस याठिकाणी बसलेले आहेत यापुढे याची नोंद घेण्यात येईल.

मा.महापौर :-  गेली कित्येक वर्षे ते बसत होते.

मा.यशवंत भोसले :-  मा.महापौर साहेब, याबद्यल काय कार्यवाही करणार आहात. सभागृहाचा अपमान झालेला आहे.

(गोंधळ)

मा.शशिकिरण गवळी :-  मा.महापौर साहेब,  वास्तविक पाहता या गोंधळामुळे सभागृहातील महत्वाचा वेळ वाया चाललेला आहे. नगरसचिव यांनी खुलासा केलेला आहे. महापौरांना कदाचित काही मदत लागत असेल म्हणून ते बसले असतील यापुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी. सभागृहाचा वेळ वाया जाता कामा नये. पुढचा विषय घ्यावा.

मा.महापौर :- यापुढे याची दखल घेतली जाईल.

मा.योगेश बहल :-  मा.महापौर साहेब, काळे साहेबांनी सांगीतले आयुक्तांना आवश्यक असतो तो स्टाफ ते बोलावतात. बोदडे यांना त्याठिकाणी बसण्याची इच्छा नाही.  बोदडे महापालिकेचे कर्मचारी आहेत मी मदतीला बोलावते म्हणून ते बसले आहेत असे महापौरांनी सांगीतले पाहिजे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, सगळयांच्या भावना लक्षात आलेल्या आहेत, कामकाजाविषयी बोलावे. अशा अनेक गोष्टी महापालिकेत आहेत. योगेश बहल यांनी मांडलेली भूमिका योग्य आहे तरी पुढचे कामकाज करावे.

------

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ५

दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ/३४२/२००९ दि.४/११/०९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९६९२ दिनांक  १०.११.२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मुंबई-पुणे हमरस्त्यानजीक असलेल्या चिंचवड येथील म.न.पा.च्या आरक्षित जागेत प्रादेशिक विज्ञान केंद्र (Regional Science Centre) आणि ‘पी पी पी’ (Public Private Partnership) तत्वावर सिटी सेंटर/बिझनेस सेंटर प्रकल्प विकसित करण्याचे प्रयोजन आहे. या प्रकल्पाचे फेरबदलास महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय

क्र./टिपीएस/१८०९/७२/प्र.क्र.१६०१/ ०९/नवि१३/२२-५-०९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत १८१ड प्रमाणे १३७०३९.४६ चौमी क्षेत्र बिझनेस सेंटर करीता आरक्षित आहे. तसेच १८१ब प्रमाणे ३०००० चौमी क्षेत्र प्रादेशिक विज्ञान केंद्र प्रकल्पासाठी आरक्षित असून ते एन.सी.एस.एम., कोलकत्ता, केंद्र सरकार आणि म.न.पा.च्या सहकार्याने बांधण्यात येणार आहे. सिटी सेंटर / बिझनेस सेंटर प्रकल्प 'पी पी पी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) या तत्वावर मनपाची कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता ९९ वर्षांच्या कालावधीकरीता राबविण्याचे ठरत असल्याने व त्यामुळे मनपास आर्थिक उत्पन्न मिळणार असल्याने नियोजीत विकसकांबरोबर डेव्हलपमेंट अग्रीमेंट व लिज डिड करणे आवश्यक आहे. विकसकाने सदरील प्रकल्पावर वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळविणे व संभाव्य ग्राहकांचे नांवे सबलिज करणेस परवानगी देणेस व याशिवाय इतर अटी,शर्ती व तपशिल ठरविण्यास, तो मान्य करण्यास व त्याप्रमाणे अंतिम करारनामे करण्यास मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, एन.सी.एस.एम., कोलकत्ता या संस्थेची सभागृहाला माहिती दयावी. ३०००० चौ.मी. क्षेत्र आहे हे कोणत्या रेटने देणार आहोत ? गव्हर्मेंटचा काय रेट आहे ? मार्केटचा काय रेट आहे ? प्लॅन कोणी केला आहे ? करारनाम्याची पुर्तता झाली का ? माहिती दयावी.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, सर्वात प्रथम पुर्वीचा प्रकल्प काय होता व महाराष्ट्र शासनाने काय फेरबदल केले याची माहिती दयावी.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, प्रादेशिक विज्ञान केंद्र आणि बिझनेस सेंटर हे दोन प्रकल्प विकसीत होणार आहेत. या संदर्भात विकास आराखडयामध्ये काय काय बदल करण्यात आला त्याचे स्पष्टीकरण दिले पाहिजे. राज्यशासनाची मान्यता मिळाली का ? पीपीपी या पध्दतीने महापालिकेमध्ये काम करतो आहोत त्याची माहिती दयावी. हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी डिझाईन्स तयार केले आहेत अशी बातमी वर्तमानपत्रामध्ये वाचली आहे त्यांनी २००० रु. फी घेऊन डिझाईन्स तयार केलेले आहेत ते सभागृहाला दाखविले पाहिजेत. त्याठिकाणी महापालिकेच्या विकास आराखडयात वेगवेगळे आरक्षण टाकलेले होते ते उचलून भोसरी परिसरामध्ये ठेवतो आहोत. तशाप्रकारचा बदल आपण करु शकतो का ? ज्यावेळेला अशाप्रकारचे स्थलांतर विकास आराखडयात करतो त्यावेळेला अंतराची काही मर्यादा आहे का ? प्रशासनाच्या वतीने स्पष्टीकरण द्यावे.

मा.संतोष बारणे :- मा.महापौर साहेब, आतापर्यंत महापालिकेमध्ये पीपीपी अंतर्गत किती प्रकल्प झालेले आहेत ? या प्रकल्पां पासून महापालिकेला किती उत्पन्न मिळाले आहे ? खुलासा करावा.

मा.मच्छिंद्र तापकीर :- मा.महापौर साहेब, पीपीपी तत्वावर आपण जागा देणार आहोत यासाठी ९९ वर्षाचा करारनामा केल्यावर तेच मालक होणार का ? येथे पाच वर्षापुर्वीच्या फाईली सापडत नाहीत तर ९९ वर्षाच्या फाईली कधी सापडणार. सन्मा.सदस्यांनी मागीतलेली माहिती दयावी हा विषय तहकूब ठेवावा.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, मनपाची जागा रिझर्व्हेशन क्र.१८१ ब व ड मध्ये ६५०० रुपये प्रती चौरस मीटर दर रेडिरेकनरनुसार आहे. जागा देतो त्याची किमंत रेडिरेकनरनुसार ८९ कोटी रुपये मिळणार आहे. हा प्लॅन मे.हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांनी केलेला आहे त्याकरीता त्यांनी र.रु. २ हजार फी आकारलेली आहे. आर्किटेक्ट नेमण्याकरिता निवीदा मागविल्या होत्या त्यात १७ जणांच्या निवीदा क्वॉलीफाय झाल्या. त्यामध्ये स्ट्रक्चर इंजिनिअर, महाराष्ट्रशासनाचे लांडगे साहेब, मा.आयुक्त साहेब,मा.उगिले साहेब यांची समिती केलेली होती. त्यांनी प्रेझेन्टेशनला महत्व देवून ७० टक्के गुण दिले व उर्वरीत ३० टक्के दर नमुद करण्यास दिले. त्यातून मे.हाफीज कॉनट्रॅक्टर यांची नेमणूक केलेली आहे. मार्केटरेट प्रमाणे आपण निवीदा मागवितो आहोत त्याच्यामध्ये प्रत्येक जणाला रेट कोट करता येणार आहेत. ॲग्रीमेंट साईन करताना आपल्याला ५० कोटी ३१ मार्च २०१० पुर्वी द्यायचे आहेत व त्यानंतर पुढील चार वर्षात ते किती पैसे देणार त्यामध्ये ज्यांचा हायेस्ट रेट आहे त्यांना निवीदा देणार आहोत.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, त्यांना आर्थिक सहाय्य देण्यास परवानगी देणार आहोत त्यांनी बँकेचे कर्ज घेतले व ते त्यांनी फेडले नाहीतर त्याला जबाबदार कोण ?

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, त्यांना बांधकाम करण्यासाठी आर्थिक सहाय्य घेण्यास परवानगी देतो आहोत. महापालिका कुठल्याही प्रकारची आर्थिक गूंतवणूक करणार नाही. त्यांना कर्ज उभारण्यास परवानगी देतो आहोत. महापालिका सभा ठ.क्र. ४५२ दि. १९.९.२००८ नुसार महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्र./टिपीएस/१८०९/७२/प्र.क्र.१६०१/०९/नवि १३/२२.५.०९ अन्वये फेरबदलास शासनाने मान्यता दिलेली आहे. पहिल्यांदा यावर रिझर्व्हेशन खुले नाटयगृह,सायकल वेलोड्रम आणि गार्डनचे होते ते रिझर्व्हेशन बदलून त्याठिकाणी बिझनेस सेंटरचे रिझर्व्हेशन करतो आहोत शासनाने मान्यता दिलेली आहे. ९९ वर्षाचे लीज करतो आहोत त्याठिकाणी त्या जागेमध्ये महापालिका कुठल्याही प्रकारची गूंतवणूक करणार नाही तो विकसक आपल्याला पैसे देवून बांधकाम करुन गूंतवणूक करणार आहे. त्यासाठी त्यांना व्यवस्थीत पिरीअेड दिला नाहीतर आपल्याला देणारे पैसे कमी होतील याचा विचार करुन कायदेशिररित्या शक्य आहे त्याप्रमाणे ९९ वर्षाचे लीज करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, राज्यशासनाने किती जागांचे चेंजेस केलेले आहेत ? ग्लोबल ॲडव्हन्टेज काय आहे ? लोकांच्या जीवाची दक्षता घेणे आवश्यक आहे. गार्डनचे चेंजेस करता येतात का ?

मा.शशिकिरण गवळी :- मा.महापौर साहेब, स.नं. १८१ ब व ड मध्ये प्रोजेक्ट बीओटी तत्वावर घेऊन आलेलो आहोत. याच्यामध्ये प्रादेशिक विज्ञान केंद्रास हरकत नाही चांगला प्रकल्प आहे त्याबद्यल काही म्हणणे नाही परंतू बिझनेस सेंटरची जागा ९९ वर्षाच्या करारनाम्यावर विकसकाला देणार आहोत. त्याला भाडयाने देण्याचा हक्क प्रदान करणार आहोत. त्यांना कर्ज उपलब्ध करण्यास अधिकार देणार आहोत. आमच्या माहितीप्रमाणे महापालिकेची जागा ४०० कोटीची आहे ती आपण १०० कोटीमध्ये ९९ वर्षाच्या करारावर देणार आहोत म्हणजे महापालिकेचे ३०० कोटीचे नुकसान होणार आहे. सगळया गोष्टी तपासाव्या लागतील त्यासाठी हा विषय तहकूब ठेवावा संपूर्ण माहिती लेखी स्वरुपात पाठवावी.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, प्रोजेक्टची कॉस्ट ४०० कोटी सांगीतली आहे तूपे साहेबांनी खुलासा करावा. ६५०० रुपये प्रती चौरस मीटर दर रेडिरेकनर नुसार आहेत. प्रत्यक्षात मार्केट रेट जास्त आहे त्यामुळे महापालिकेनी याची कॉस्ट ९० कोटी किंवा १०० कोटी ग्राहय धरायला नाही पाहिजे.

एक्सवायझेड माणसाची प्रॉपर्टि असेलतर व ती ९९ वर्षाच्या कराराने द्यायची म्हणलेतर त्या जागेची किमंत ठरविली जाते तसे महापालिकेनी ठरवायला पाहिजे. जो घेणारा आहे तो त्यामध्ये काय काय करणार आहे ? ती कमर्शिअल जागा आहे त्यात काय काय ॲक्टिव्हीटीज करणार आहे ? याचा खुलासा केला पाहिजे. त्याठिकाणच्या या प्रॅापर्टिची खुप व्हॅल्यू आहे त्यामुळे या प्रॉपर्टिमध्ये महापालिकेला चांगले उत्पन्न मिळू शकते अशाप्रकारची भूमिका मांडल्यानंतर सभागृहाने परपज चेंजचा विषय मान्य केला आहे. शासनाने सुध्दा त्याला मान्यता दिलेली आहे. पीपीपी हा शब्द त्या सभेला नव्हता म्हणून हा विषय पुन्हा आला आहे त्यामुळे कोणाचाही गैरसमज होऊ नये. मार्केट रेटप्रमाणे याची किमंत काय आहे हे सांगावे. त्याठिकाणी टिडीआर किती वापरणार ? एफएसआय किती वापरणार ? खुलासा करावा म्हणजे विषय मंजूर करता येईल.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, पुर्वी कमर्शिअल म्हणून .५ एफएसआय होता शर्मा साहेबांनी अभ्यास केला,मिटिंग घेतली, चांगली एजन्सी येथे येवून कोटयावधीची गूंतवणूक करणार त्यांचे पैसे सुध्दा परत मिळायला पाहिजेत. मुळात ही जागा काटे यांची आहे, ती खदान होती. ही जागा महापालिकेनी फक्त एक रुपयात घेतलेली आहे. परंतू तरी सुध्दा आज मार्केट व्हॅल्यूप्रमाणे धरणे गरजेचे आहे. त्यामध्ये महापालिकेची कसल्याही प्रकारची जबाबदारी नसायला पाहिजे. महापालिकेचा एक रुपया सुध्दा खर्च होणार नाही,जबाबदारी राहणार नाही. ८९ कोटी आपण सांगीतलेले आहे. आपण शासनाकडे गेल्यानंतर चेंजेस केल्यानंतर त्याठिकाणी एफएसआय व टिडीआर किती अनुज्ञेय आहे त्यात

कमर्शिअल किती आहे, एन्टरटेन्मेंटसाठी किती आहे, याचा खुलासा करावा. त्यातील टेक्निकल बाबी समजायला पाहिजेत, विषय चांगला आहे सर्व प्रश्नाचा व्यवस्थीत खुलासा पाहिजे.

मा.संतोष बारणे :- मा.महापौर साहेब, मुळात म्हैस पाण्यात आणि आपण व्यवहार करण्यासाठी निघालो आहोत. अशाप्रकारचे चुकिचे विषय सभागृहात आणून प्रशासनाने बदनामी करु नये महापालिकेनी १ रुपयाला खरेदी केली म्हणून त्या बिल्डरला फुकट जमिन द्यायची का ? महापालिकेची स्थावर मालमत्ता भाडयाने किंवा विकण्याचा अधिकार आयुक्तांना आहे हे बरोबर आहे परंतू कायदेशिर मत काय आहे. कायदेतज्ञांनी खुलासा करावा. महापालिकेची स्थावर मालमत्ता भाडयाने किंवा विकण्यासाठीचे काही नियम असतील. तरी याचा कायदेशीर खुलासा करावा.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, जे रेडिरेकनरचे रेट दिलेले आहेत ते ६५०० रुपये प्रति चौ.मी.हा बेस धरलेला नाही. आपल्याला जास्तीत जास्त रक्कम कशी येईल यादृष्टिने निवीदा मागविलेल्या आहेत त्याप्रमाणे टेंडर काढलेले आहे. डेव्हलपमेंट कंट्रोल रुल प्रमाणे एफएसआय अलौड होईल. त्याठिकाणाहून ४५ मी. चा बीआरटीएस रोड जातो त्याठिकाणी १.८ एफएसआयची शासनाकडे मागणी केलेली आहे ती मंजूर व्हायची आहे.त्यामध्ये कंडीशन्स टाकणार आहोत. डीएसआर प्रमाणे एफएसआय अलौड आहे त्याप्रमाणे कोट करायचे आहे. बीआरटीएसचे १०० मी. चे अंतर धरलेतर ५० टक्के प्लॉट त्यामध्ये येतो परंतू विकसकाने शासनाकडे काही खास प्रयत्न करुन एफएसआय वाढवून घेतलातर त्याप्रमाणे महापालिकेला पैसे द्यायचे असे करारनाम्यामध्ये मुद्दे आहेत. जास्तीत जास्त रेट ज्यांचे येतील त्यांना देणार आहोत. जावेद शेख यांनी गार्डन बद्दल प्रश्न विचारला होता. गार्डनचे रिझर्व्हेशन होते मे.हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी डिझाईन केलेले आहे. त्याठिकाणी नैसर्गिकरित्या पाणी असणार आहे. काही पिलर पाण्यामध्ये असतील. हे नैसर्गिकरित्या करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, त्याठिकाणी किती जागा ठेवलेली आहे ही स्किम प्राधिकरणाकडे राहणार आहे का महापालिकेकडे राहणार आहे. याचा कारभार पुन्हा कोणाकडे जाणार आहे हे व्यवस्थीत सांगावे.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, विषयाची पुर्ण माहिती नगरसेवकांना मिळावी. विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

मा.रघुनंदन घुले :- मा.महापौर साहेब, प्रोजेक्टच्या शेजारुन ४५ मी.चा रोड जातो. एसपीव्ही कंपनीबद्यल काय, याचा लेखी खुलासा करावा.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, विषय चांगला आहे. सर्व प्रश्नाची नोंद करुन त्या प्रश्नाची कॉपी सर्व नगरसेवकांना मिळाली पाहिजे. अजून माहिती

पाहिजे असेलतर ती विचारावी पुढच्या मिटिंगला माहिती दयावी हा विषय तहकूब ठेवावा.

मा.महापौर :- संबंधीत अधिका-यांनी नगरसेवकांचे जे प्रश्न आहेत त्याची माहिती लेखी स्वरुपात दयावी.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-७३६ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ/३४२/२००९ दि.४/११/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९६९२ दिनांक १०.११.२००९

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नरवि/कावि/५/२३/२००९ दि.१५/१०/२००९

विषय :- <u>विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड</u>
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ऐ ऐ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ बाबतचा फेरबदल प्रस्ताव (वैद्यकीय संस्थाबाबत)

संदर्भ :-१. शासनाच्या नगरविकास विभागाकडील
दि.११/०६/०९ रोजीच्या शासन निर्णया सोबतची नोटीस
क्र.टिपीएस-२२०८/२९८७/प्र.क्र.१७१९/०९

(पिंपरी चिंचवड) नवि -१३, राजपत्रात प्रसिध्द दि.३०/०७/०९.

२. नियुक्त अधिकारी, तथा उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.विनिनि/पिंचिंमनपा/फेरबदल/कलम ३७ (१) (ऐ ऐ) नियम क्र.एन २.२.३/उसंपुवि/१७३२, दि.४/९/०९.

विषयांकित प्रकरणी शासनाच्या नगर विकास विभागाने संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयान्वये नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे दवाखाना या वापरासाठी नियमानुसार चटई क्षेत्र निर्देशांक पेक्षा ५०% वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे तसेच सदर नियम सहकार तत्वावर सुरु असलेल्या वैद्यकीय संस्थांना देखिल लागु होतील परंतु सदर संस्था आयकर अधिनियम व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत असावेत याबाबतचे फेरबदल पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजुर विकास नियोजन नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ मध्ये सुधारणा करण्यासाठी विषयांकित फेरबदलाची नोटीस प्रसिध्द केलेली आहे. उक्त नोटीसीच्या शासन राजपत्रात प्रसिध्दी पासुन ३० दिवसांच्या मुदतीत नियुक्त अधिकारी यांचेकडे एकही सुचना/हरकत अर्ज दाखल झालेला नसल्याचे संदर्भ पत्र क्र.२ अन्वये कळविलेले आहे. विषयांकित प्रकरणी शासनाकडील दि.३०/०७/०९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झालेली नोटीसीचे अनुषंगाने सदर प्रस्तावाबाबत नियोजन प्राधिकरण या नात्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.सर्वसाधारण सभेचे मत व त्यास मान्यता घेवुन तसा अहवाल सदर पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झालेच्या दिनांकापासुन अधिनियमातील तरतुदीनुसार एक महिन्याच्या विहित मुदतीत पाठविणे बाबत कळविले आहे.

सबब, वरीलप्रमाणे फेरबदल संदर्भाने नियोजन प्राधिकरण या नात्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली आहे त्याप्रमाणे मा.आयुक्त यांच्या मागणीस मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, या विषयाबद्यल नगररचना विभागाने माहिती द्यावी. नेमके आपल्याला काय अपेक्षीत आहे. आतापर्यंत १.५

एफएसआय अनुज्ञेय करत होतो, शासनाच्या मंजूरीप्रमाणे आपण टिडीआर देतो. हे कोणाला द्यायचे हे सांगावे.

मा.पाटिल :- मा.महापौर साहेब,शासनाने नोटिस प्रसिध्द केली आहे. मेडीकल इन्स्टिटयूशन बाबत आपल्या रुल्समध्ये तरतूद आहे. को ऑपरेटीव्ह बेसीसवर त्यांना सुध्दा मिळणार आहे. सर्क्यूलर काढलेले आहे. १५ टक्के प्रिमिअम भरायचा

त्यातील निम्मी रक्कम शासनाला आणि निम्मी रक्कम महापालिकेला येते. सेम रुल्स एक्सपॉन्ड करुन मेडीकल इन्स्टिटयूशनला लागू करण्याचा प्रस्ताव आहे. वैद्यकिय संस्थाना सुध्दा लागू करण्यासाठी आहे परंतू त्या नोंदणीकृत पाहिजे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मोठे हॉस्पिटल याची काही व्याख्या आहे का ? त्यात काही निर्बंध टाकले आहेत का ? प्रिमिअम आपण का घेतो ? विषय आयुक्तांकडून आलेला आहे.

मा.पाटिल :- मा.महापौर साहेब, २६ जून ०६ रोजी शासनाने प्रिमिअमची ऑर्डर काढलेली होती ती सूध्दा लागू झालेली आहे. साडेसात आणि साडेसात टक्के आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, ज्या धर्मदाय संस्था आहेत त्यांना ५० टक्के एफएसआय वाढवायचा असा विषय आहे. अशा आपल्या शहरामध्ये किती संस्था आहेत त्याची सविस्तर माहिती द्यावी. अशाप्रकारचे वाढीव चटई क्षेत्र देत असताना या शहरातील गोरगरीब लोकांना माफक दराने उपचार दयावे म्हणून त्यावर शासनाचे किंवा महापालिकेचे काही बंधन आहेत का ? आपण ज्यावेळेला वाढीव क्षेत्र देणार आहोत त्यावेळेला धर्मदाय संस्थांचे किती दवाखाने आहेत, त्याच्यावर शासनाचे बंधन असणार का याचे स्पष्टीकरण दयावे. विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब,सूचनेस अनूमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-७३७ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नरवि/कावि/५/२३/२००९ दि.१५/१०/२००९

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-७३८ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २०.११.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा. महिला व बालकल्याण समिती

दि.१२/८/०९ व २४/८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

(मा.अपर्णा डोके महापौर यांचा महापौर पदाचा पदावधी संपुष्टात येणार असल्याने त्यांच्या कार्याबाबत अभिनंदन व्यक्त करुन मा.सदस्यांनी त्यांना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. मा.महापौर यांनी आभार व्यक्त करुन मा.सदस्यांना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या )

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

(अपर्णा निलेश डोके)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ३५५ /०९
दिनांक :- २/ १२ /२००९

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.